# लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : सोमवार - १० जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १०४
पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com







## त्यांच्या मते....

▣ राज्यात दोन उपमुख्यमंत्री करता, गावच्या विकासासाठी ग्रामपंचायतेत दोन उपसरपंच ठेवा
-माजी सरपंच राजीव साळुंके

एक मुख्यमंत्री बाकी सर्व उपमुख्यमंत्री अशी मागणी होऊ शकते.

▣ शरद पवार यांनी कॉंग्रेस पक्ष फोडल्याची 'सल' माझ्या मनात अजूनही आहे.
-पृथ्वीराज चव्हाण

'ती' कायम राहणार

▣ 'बावनखुळे' अशी टिका पुन्हा केली तर तुमचे कपडे फाडल्याशिवाय राहणार नाही.
- भाजपा आ. प्रसाद लाड

सद्या चालू आहे ते काय?

▣ शरद पवार गटात जायचे कि दादाच्या याबाबत माझ्यासमोर संभ्रम आहे.
- आ. सरोज अहिरे

'इकडे आड, तिकडे विहिर' धर्तीवर 'इकडे साहेब, तिकडे दादा' असा जनतेतही संभ्रम आहे.

## राज्यातील शालेय शिक्षणाची घसरगुंडी

मुंबई : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने शालेय शिक्षण व्यवस्थेच्या कामगिरी संबंधी वर्गवारी करणाऱ्या निर्देशांकाचा अहवाल २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षाचा जाहीर केला असून यात महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचा दर्जा घसरल्याचे निदर्शनास येत आहे.

केंद्राकडून शालेय शिक्षण प्रणालीचे मूल्यमापन करण्यात येते. त्यानुसार सन २०२१-२२ साठी मूल्यमापन निकषांमध्ये काही बदल करून 'परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स २.०' असं नामकरण करण्यात आलं आहे. त्यानुसार एकूण ७३ निकषांवर मूल्यमापन करण्यात आलं आहे. निष्पत्ती आणि प्रशासकीय व्यवस्थापन या दोन गटांत हे निकष विभागण्यात आले आहेत. सुमारे १४ लाख ९० हजार शाळा, ९५ लाख शिक्षक आणि विविध सामाजिक-आर्थिक पार्श्र्वभूमी असलेले सुमारे २६ कोटी ५० लाख विद्यार्थी यांना सामावून घेतलेली भारतीय शिक्षण व्यवस्था, जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने या आधी, राज्यांसाठी शिक्षण व्यवस्थेचा कामगिरी वर्गवारी निर्देशांक तयार केला आणि संदर्भ वर्ष २०१७-१८ ते २०२०-२१ साठी अहवाल जारी केला. या राज्य कामगिरी वर्गवारी निर्देशांकाच्या यशावर आधारीत, सर्व जिल्ह्यांच्या कामगिरीची वर्गवारी करण्यासाठी, आता जिल्ह्यांसाठी ८३-निर्देशक आधारीत पीजीआय-डी ची रचना करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यांद्वारे, ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून माहिती भरली जाते. निर्देशांकानुसार, मिळालेले पीजीआय गुणांकन, जिल्ह्याने कुठल्या बाबतीत सुधारणा करणे आवश्यक आहे ते वेगवेगळ्या निर्देशकानुसार दर्शवते. २०१८-१९ आणि २०१९-२० साठी पीजीआय-डी अहवाल, यापूर्वी जारी करण्यात आला आहे. सध्याचा अहवाल हा २०२०-२१ आणि २०२१-२२ चा एकत्रित अहवाल आहे.

पीजीआय-डी च्या संरचनेत, विविध प्रकारच्या मुल्यांकनासाठी ८३ निर्देशक ठरवण्यात आले असून त्यांचे एकूण मूल्यमापन ६०० गुणांमध्ये केले आहे. या ८३ निर्देशकांची ६ गटांमध्ये विभागणी केली आहे. मिळालेले एकंदर परिणाम, वर्गातून केल्या जाणाऱ्या अध्यापनाची परिणामकारकता, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांचे हक्क, शाळा सुरक्षा आणि बाल संरक्षण, डिजिटल अध्ययन आणि प्रशासन प्रक्रिया, हे ते सहा गट आहेत. हे सहा गट पुढे १२ भागांमध्ये विभागले आहेत. पीजीआय-डी ने जिल्ह्यांसाठी दहा श्रेणी निश्र्चित केल्या आहेत. उदा. दक्ष, ही सर्वोत्तम श्रेणी आहे. सहा गटांपैकी एका गटात किंवा एकंदर सर्व सहा गट मिळून ज्या जिल्ह्याला ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळतात त्यांना दक्ष ही श्रेणी दिली जाते. दहा टक्क्यांपर्यंत गुण मिळणाऱ्या जिल्ह्यांना आकांक्षी-३ ही श्रेणी दिली जाते आणि ही श्रेणी सर्वात तळाची आहे.

## हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हमुळे शहराच्या वैभवात भर - अमित देशमुख

लातूर : शहराची गरज ओळखून सुरू केलेला हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्ह हा प्रकल्प लातूर शहराच्या वैभवात भर टाकेल, असा विश्वास माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी व्यक्त केला. काल लातूरच्या औसा रोडवरील हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

लातूर शहरातील औसा रस्त्यावर खवय्यांची रुचकर पदार्थांची गरज पूर्ण करण्यासाठी नंदकुमार विश्वनाथ क्षीरसागर यांनी हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हची सुरुवात करण्यात आली आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांच्या हस्ते रविवार दि. ९ जुलै रोजी सायंकाळी हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हचा शुभारंभ कार्यक्रम



क्षीरसागर मित्र परिवार व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला, या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हची पाहणी करून ग्राहकाकरिता असलेली बैठक व्यवस्था, रंगसंगती, हॉटेल मधील फर्निचर व अंतर्गत सजावट याचे कौतुक केले. दरम्यान यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे क्षीरसागर परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. या शुभारंभ प्रसंगी शहाजीभाऊ पवार, गोकुळ माऊली शुगरचे चेअरमन व्ही. पी. पाटील, अ‍ॅड. किरण जाधव, व्हा. चेअरमन विजय देशमुख, व्हा. चेअरमन रवींद्र काळे, व्हा.चेअरमन समद पटेल, दिलीप माने, बी.एस.पवार, शाखा प्रबंधक एस.व्ही.सी.बँकेचे विशाल पवार, संजय जाधव, गणेश एसआर देशमुख, कैलास पाटील, बादल शेख, प्रताप पाटील या मान्यवरासह हॉटेल राधिका एक्झिक्युटिव्हचे विश्र्वनाथ क्षीरसागर आदी उपस्थित होते. यावेळी शुभेच्छापर भाषणात बोलताना माजी मंत्री आ. अमित देशमुख म्हणाले की, अत्यंत जलद गतीने विकसित होत असलेल्या लातूरची गरज ओळखून सुरू केलेला हा प्रकल्प शहराच्या वैभवात भर घालणारा ठरेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी पूढे बोलतांना ते म्हणाले, लातूरची वाटचाल आज प्रगतीपथावर आहे. येथील शिक्षण, उदयोग, व्यापार, व्यवसाय, पायाभूत सुविधांची उभारणी सर्व क्षेत्रात झालेली भरभरभराट मधून लातूर नावारूपाला आले आहे, ही लोकनेते विलासराव देशमुख यांच्या कर्तृत्वातून घडले आहे.

या कार्यक्रमास एस.आर.उतके, बजरंग मगरूळकर, सी.एन.खानापूरे, मोहन भिसे, बी.आर.मोरे, व्यकंटराव देशमुख, प्रभाकर शेटटी, सतीश पवार आदी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे नंदकुमार क्षीरसागर, राहुल क्षीरसागर, अतुल क्षीरसागर, अमोल क्षीरसागर, गणेश भटकर, रामनाथ क्षीरसागर, वैजनाथ क्षीरसागर यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रस्तावीक संजय जेवरीकर, सूत्रसंचलन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर आभार राहूल क्षिरसागर यांनी मानले.

## लोकसभेच्या ५ जागा दिल्या तरच भाजपसोबत-जानकर



पंढरपूर : राष्ट्रीय समाज पक्ष हा एनडीएचा घटक पक्ष आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत लोकसभेच्या ५ जागा रासपला दिल्या तरच भाजपासोबत राहू, अन्यथा सोडचिट्टी, असे मत रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी व्यक्त केले आहे.

महादेव जानकर हे जनस्वराज्य यात्रा काढत आहेत. त्या यात्रेचा शुभारंभ आज त्यांनी पंढरपूर येथे जाऊन संत नामदेव पायरीचे दर्शन घेवून केला. महादेव जानकर यांनी येत्या लोकसभा निवडणुकीत एनडीएने आमच्या पक्षास बारामती, माढा, सांगली, परभणी आणि ईशान्य मुंबई या पाच जागा दिल्या तरच त्यांच्यासोबत राहु अन्यथा नाही, असे आव्हान दिले आहे. राज्यामध्ये शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या सभांना मोठी गर्दी होत आहे. राज्यातील जनता शहाणी आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. रासपची भूमिका सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी आपण ही यात्रा काढत आहोत. भाजपाने आम्हाला ५ जागा दिल्या नाही तर देशात ४५३ ठिकाणी आम्ही आमचे उमेदवार उभे करू असेही त्यांनी सांगितले. आज नाही पण एक दिवस मी देशाचा पंतप्रधान बनून विठ्ठलाच्या दर्शनाला येणार असल्याचा विश्वास महादेव जानकर यांनी व्यक्त केला.

## पाचशेच्या ९६ लाखांच्या नोटा घेवून २ हजाराच्या १ कोटीच्या नोटा देण्याचे आमिष

### सोलापूर-लातूर-रेणापूर-बीड-कळंब येथील ८ जणांवर गुन्हा

लातूर : कळंब येथील एका व्यापाऱ्यास त्यांच्याकडून ५०० रूपयांच्या ९६ लाख रूपये मुल्याच्या नोटा घेवून त्यांना २ हजार रूपयांच्या १ कोटी मुल्याच्या नोटा देण्याचे आमिष दाखवून लातूर येथे बोलावून कळंबच्या व्यापाऱ्याची फसवणूक केल्या प्रकरणी लातूरच्या एमआयडीसी पोलिसांत सोलापूर, लातूर, बीड व कळंब येथील ८ जणांविरूद्ध भादंवि ४२०, १२० ब, ५११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

८ जुलै रोजी सायं. ५ वाजण्याच्या सुमारास कळंब येथील एक व्यापारी अजिंक्य अभय देवडा (वय ३२) यास मयूर धोका रा. कळंब, श्याम घोगरदरे, संदीप शिवणीकर, बालाजी रसाळकर तिघेही रा. सोलापूर, मेघश्याम पांचाळ रा. चव्हाणवाडी, ता. गेवराई, शेख इमाम रा. भोकरंबा, ता. रेणापूर, किशोर माने रा. चाडगाव ता. रेणापूर, बालाजी कोयले रा. लातूर यांनी आमच्याकडे २ हजार रूपयांच्या नोटा आहेत. तुम्ही ५०० रूपयांच्या ९६ लाख रूपये किंमतीच्या नोटा घेवून या आम्ही तुम्हाला १ कोटी मुल्याच्या २ हजार रूपयांच्या नोटा देतोत असे आमिष दाखविले. ९६ लाख रूपये, ५०० रूपयांच्या नोटेच्या स्वरूपात अजिंक्य देवडा हे घेवून आले. ८ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास हरंगुळ रेल्वे स्टेशन परिसरातील अतिरिक्त एमआयडीसी भागातील एका गोदामामध्ये नोटांची अदलाबदल करण्याचे प्रकार चालू आहे अशी माहिती विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यास मिळाल्यानंतर तिथे त्यांनी छापा मारला. दरम्यान, एमआयडीसी व इतर विभागाचे पोलीसही त्या ठिकाणी एकत्रीत झाले. त्यानंतर काल दिवसभर लातूर शहरात बनावट नोटा सापडल्या अशी चर्चा होऊ लागली. एमआयडीसी पोलीस ठाणे परिसरात मोठ्या प्रमाणात माध्यमांचे प्रतिनिधी माहिती घेण्यासाठी तिथे आले. पण, तेथील पोलीस निरीक्षक यांनी माध्यम प्रतिनिधींना अत्यंत दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली. एका पत्रकाराला तर काही वेळ तिथेच थांबवून घेवून त्याचा मोबाईल तपासण्यात आला, असेही कळते. यानंतर शहरभर या नोटा खऱ्या की खोट्या, हे गुन्हेगार कोण आहेत. नेमका काय प्रकार चालला आहे, याची उलट-सुलट चर्चा चालू होती. काल रात्री उशिरा या प्रकरणी कळंब येथील व्यापारी अजिंक्य अभय देवडा यांच्या फिर्यादीवरून ८ जणांविरूद्ध वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक डोके हे अधिक तपास करीत आहेत.

## ३२ लाखाचा हायवा, ३० हजाराची वाळू जप्त

लातूर : शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंडीयन ऑईल पेट्रोल पंपजवळ शिरूर अनंतपाळ येथे अवैध स्वरूपात वाळू बाळगल्या प्रकरणी पोलिसांनी ३२ लाखाचा हायवा व ३० हजार रूपयांची वाळू असा ३२ लाख ३० हजार रूपयांचा ऐवज जप्त करून एका विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आज पहाटे एम.एच. २७-बीएक्स-६९५६ क्रमांकाचा हायवे पेट्रोल पंपानजीक आढळून आला. त्या हायवामध्ये सुमारे ६ ब्रास येजगी वाळू दिसून आली. विनापास परवाना अवैधरित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ही वाळू बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी चंद्रकांत वैजनाथ केदार रा. रामवाडी, ता. रेणापूर याच्या विरोधात शिरूर अनंतपाळ पोलिसांत गुन्हा दाखल केला असून त्याच्या ताब्यातून ३२ लाखाची हायवा व ३० हजार रूपयांची वाळू असा ऐवज जप्त केला आहे.



लातूरच्या गिरवलकर मंगल कार्यालयात दि. ७ जुलैपासून रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथा वाचन आयोध्या निवासी स्वामी डॉ. राघवाचार्य महाराज कथेच्या मंडपात नियोजित श्री प्रभू रामचंद्र मंदीर अयोध्या येथील प्रतिकृती उभारण्यात आली आहे. कथे साठी येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. (फोटो प्रकाश कंकाळ)

## शिंदे गट उत्तर देण्यासाठी वेळ मागण्याची शक्यता

मुंबई : विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी शिवसेना व ठाकरे गटाच्या अशा ५४ आमदारांना अपात्रतेसंदर्भात नोटीस पाठवून ७ दिवसात उत्तर देण्याचे म्हटले आहे. आज शिवसेना विधानसभा अध्यक्षांकडे उत्तर देण्यासाठी वेळ मागण्याची शक्यता आहे.

प्रस्तुत पत्र आपणांस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत आपले लेखी अभिप्राय सादर करण्याबाबत कळवण्यात आले होते. दरम्यान, अद्याप आपणांकडून या प्रकरणी लेखी अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत. यासंदर्भात पारस्पारिक संबंध असलेल्या अन्य निरर्हता अर्जाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात याचिकांद्वारे काही घटनात्मक मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. दिनांक ११ मे २०२३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने उक्त याचिकांवर अंतिम निकाल दिला असून त्यामध्ये न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी भारतीय राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूची अंतर्गत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घेण्याबाबत अभिप्राय नोंदविले आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आपणांस आता पुनश्च याद्वारे कळविण्यात येते की, आपण प्रस्तुत निरर्हता अर्जावर आपले लेखी अभिप्राय, योग्य त्या कागदपत्रांसह, हे पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांकडे सादर करावेत. उक्त मुदतीत उपरोक्तप्रमाणे आपण आपले लेखी अभिप्राय सादर न केल्यास आपणांस या अर्जाबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे समजून सदरहू अर्जावर निर्णय घेण्यात येईल. तरी आपण आपले लेखी अभिप्राय विहित मुदतीत मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचेकडे सादर करावेत.

महाराष्ट्रत राजकीय उलथापालथ सुरु असतानाच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं महत्त्वाचं वक्तव्य समोर आलं होत. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून शिवसेनेच्या घटनेची प्रत आपल्याला मिळाली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ शिवसेना आमदारांविरुद्धच्या अपात्रतेच्या याचिकांवर लवकरच सुनावणी सुरु होणार आहे, असं राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी (७ जुलै) सांगितलं होतं. राहुल नार्वेकर यांनी निवडणूक आयोगाकडे शिवसेनेच्या घटनेची प्रत मागितली होती. ही प्रत त्यांच्या कार्यालयाला मागील आठवड्यात मिळाली आहे. आता आम्ही सुनावणी सुरु करु, असं राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. ही प्रक्रिया प्रत्यक्षात कधी सुरु होणार असं विचारलं असता नार्वेकर यांनी 'लवकरच' असं उत्तर दिलं होतं.

ठाकरे गटाने या आठवड्याच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करुन आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी अध्यक्षांना निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजीच्या निकालात विधानसभा अध्यक्षांना याचिकांवर मुदतीत निर्णय घेण्याचे निर्देश दिले असतानाही राहुल नार्वेकर हे जाणूनबुजून सुनावणीला उशीर करत असल्याचा दावा केला, याचिकेत करण्यात आला होता.



## मकरंद सावे, प्रशांत पाटील यांचा सत्कार

लातूर : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजितदादा गट) च्या लातूर शहर जिल्हाध्यक्षपदी मकरंद सावे तर कार्याध्यक्ष पदी प्रशांत पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वतीने या दोन्ही पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, मुर्तुजा खान, नवनाथ आल्टे, लाला सुरवसे, राहुल कांबळे, अनिल गायकवाड, विशाल आवडे, बाळासाहेब जाधव, प्रणिता सूर्यवंशी, आशिष कोकाटे, मीना कांबळे, राजेश खटके, प्रविणसिंह थोरात, मयुर बनसोडे, जितेंद्र गायकवाड, बालाजी चौरे, उमेश बारकुले, मयूर जाधव, कबीर शेख, जहाँगीर शेख, सोहम गायकवाड, इर्शाद सय्यद, मोहन दिवटे, फिरोज बागवान, नवनाथ भोसले, सुरज सुरवसे, मयुर जाधव, सुनील रणदिवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## फेरीवाले, टपऱ्या, फळे यावरील घाणीकडे पालिकेचे दुर्लक्ष

लातूर : उघड्यावर टपऱ्या टाकून खाद्यपदार्थ, फळे विक्री करणारे फेरीवाले, टपऱ्या यांच्याकडे लातूर शहर महानगरपालिका जाणीवपूर्व दुर्लक्ष करीत असल्याने पावसाळ्याच्या या दिवसात नागरिकांसमोर आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरात मोठ्या प्रमाणात पेरू, जांभळं, ज्युस सेंटर, शहाळं, भेळवाले, खाद्य पदार्थांची दुकाने, छोटी-मोठी हॉटेल्स, हॉटेल्सची पडणारी घाण याकडे महापालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. असे उघड्यावरील पदार्थावर घाणीवरील माश्या बसलेल्या असतात. जांभूळ छोट्या छोट्या पदार्थावर माश्या बसलेल्या असतात. या माश्या एका हाताने सारतच त्यांची विक्री केली जाते. यातून नागरिकांना रोगराईला सामोरे जावे लागत आहे. महापालिकेकडे अन्न व भेसळ विभाग नाही. महापालिका याकडे लक्ष देत नाही. हा प्रकार लातूरसारख्या शहरामध्ये नागरिकांसाठी धोकादायक बनला आहे. शहरात मोठ्या प्रमाणात बाहेरगावचे विद्यार्थी राहतात, बाहेरगावचे नागरीक येतात. त्यांच्या आरोग्यावरही पालिकेच्या दुर्लक्षाचा परिणाम होऊ शकतो. पालिकेने तात्काळ खबरदारी घ्यावी, अशी जनतेची मागणी आहे.

## जेवरे-शिंदे

पत्रकार राम जेवरे (मोरे) यांचे चिरंजीव अविनाश यांचा विवाह विश्वनाथ शिंदे रा. लातूर यांची कन्या चि. सौ. कां. विद्या यांच्या समवेत मंगळवार, दि. ११ जुलै रोजी दु. १२.२३ वाजता रूक्मीणी मंगल कार्यालय, पोद्दार स्कुलसमोर औसा-बार्शी रिंग रोड लातूर येथे संपन्न होत आहे. नववधू-वरांना दै. भूकंप परिवाराच्या वतीने हार्दिक शुभेच्छा.

# भारतातील अनोखे शिवमंदिर, येथे दगडावर हात मारल्यावर येतो डमरूचा आवाज



भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत, ज्याची गुपिते आजपर्यंत कोणालाही उकलता आलेली नाहीत. या रहस्यांमुळे ही ठिकाणे लोकांमध्येही लोकप्रिय आहेत. हिमाचल प्रदेशचे जटोला शिव मंदिर हे या ठिकाणांपैकी एक आहे, ज्याचे रहस्य अद्याप उलगडलेले नाही.

हे मंदिर हिमाचल प्रदेशातील सोलन येथे आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक या मंदिराला भेट देण्यासाठी येतात. आशियातील सर्वात उंच मंदिरांपैकी हे एक असल्याचा दावा केला जात आहे.

मंदिराच्या आत स्फटिकाचे शिवलिंग आहे. मंदिराच्या वरच्या भागात ११ फूट उंच सोन्याचा कलशही बसवण्यात आला आहे. त्यामुळे लोक येथे भेटीसाठी येतात.

या मंदिरातील दगडावर हात मारल्याने डमरूचा आवाज येतो असे म्हणतात. द्रविश शैलीत बांधलेले हे मंदिर सुमारे १११ फूट उंच आहे. येथे भगवान शिव स्वतः आले होते, अशी लोकांची श्रद्धा आहे.

या मंदिराची पायाभरणी १९७४ साली झाली. करोडो खर्चून बांधलेले हे मंदिर पूर्ण होण्यास ३९ वर्षे लागली. देश-विदेशातील भाविकांनी दिलेल्या पैशातून हे मंदिर उभारण्यात आले आहे.

# लग्न होत नसेल तर टेन्शन घेऊ नका! आता सरकार देतंय लग्न न झालेल्या मुलामुलींना २७५० रुपये मासिक पेंशन

चंदीगड : सध्या लग्न हा अतिशय महत्वाचा विषय झाला आहे. अनेकांची लग्न होत नाहीत यामुळे अनेक मुलं चिंतेत आहेत. असे असताना आता लग्न न झालेल्यांसाठी हरयाणा सरकारने मोठी घोषणा केली आहे.



४५ ते ६० वयोगटातील ज्या पुरुषांचे आणि महिलांचे लग्न झालेलं नाही त्यांना हरयाणा सरकारकडून २,७५० रुपयांची मासिक पेन्शन मिळणार आहे. यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. ज्या अविवाहित पुरुष आणि महिलेचे वार्षिक उत्पन्न हे १.८० लाखांच्या आत आहे त्यांना या पेन्शनचा लाभ मिळणार आहे. यामुळे याची चर्चा संपूर्ण भारतात आहे. हरियानामध्ये ही योजना लागू झाल्यानंतर राज्यातील सुमारे १.२५ लाख लोकांना याचा लाभ मिळणार आहे. यावेळी हरियाणामध्ये वृद्धापकाळ, विधवा निवृत्ती वेतन आणि अपंग निवृत्ती वेतनाची सुविधा दिली जाते. तसेच हरियाणा सरकारने वृद्धापकाळ निवृत्ती वेतन ३००० रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी आज अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या.



# पावसात भिजल्यामुळे बंद झाला फोन, तर तो पुन्हा कसा सुरू करायचा, फॉलो करा या टिप्स

सध्या देशभरात मॉन्सून दाखल झाला आहे. अशा परिस्थितीत जर पावसात बाहेर गेल्याने तुमचा स्मार्टफोन भिजत असेल, तर तुम्ही काही खास टिप्स फॉलो कराव्यात. तुम्ही या स्टेप्स फॉलो केल्यास, तुमचा बंद पडलेला स्मार्टफोन पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे.

**स्मार्टफोन कोरडा करा**

स्मार्टफोन ओला झाल्यावर बंद झाला असेल, तर सर्वप्रथम स्मार्टफोनला पूर्णपणे कोरडा करा. त्याचप्रमाणे स्मार्टफोनमधून बॅटरी काढता येत असेल तर फोनची बॅटरी काढा. सिम कार्ड आणि मायक्रोएसडी कार्ड देखील काढा. यानंतर फोन स्वच्छ कापडाने पुसून हवेशीर असलेल्या कोरड्या जागी ठेवावा.

**तांदळाच्या पिशवीत ठेवा**

दुसरा उपाय म्हणजे तुमचा स्मार्टफोन तांदळाच्या पिशवीत ठेवा. तांदूळ तुमच्या फोनमधील ओलावा शोषून घेतो. यामुळे तुमचा स्मार्टफोन रीस्टार्ट होतो.

**बॅटरी चार्ज करा**

तुमचा स्मार्टफोन कोरडा झाल्यावर तुम्ही तो चार्ज करावा. ते तुमच्या मूळ चार्जरशी कनेक्ट करा आणि चार्जिंग पॉइंटमध्ये प्लग करा. लक्षात ठेवा की चार्जर आणि चार्जिंग पॉइंट सुरक्षित असणे आवश्यक आहे.

**काय करू नये**

जर स्मार्टफोन ओला झाल्यामुळे बंद झाला असेल, तर ते सुकविण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करू नका, कारण जास्त गरम झाल्याने स्मार्टफोन खराब होण्याचा धोका वाढतो.

ओला स्मार्टफोन चार्ज करू नका. अन्यथा, स्मार्टफोनमधील ओलाव्यामुळे शॉर्ट सर्किट होऊ शकते.

टीप - या सर्व टिप्स फॉलो केल्यानंतर स्मार्टफोन चालू होत नसेल तर स्मार्टफोन रिपेअरिंग करणाऱ्याला दाखवा.

# खरिपाच्या पेरण्या खोळंबल्यामुळे शेतकरी चिंतेत; पावसाची पाहावी लागणार वाट

पुणे : राज्यात उशिरा दाखल झालेल्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कोकण, मुंबई, पुण्यासाह अनेक भागात पाऊस जोरदार बरसत आहे. परंतु कोकण वगळता राज्याच्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये पर्जन्यमान सरासरीखालीच आहे. राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २२ टक्के कमी पाऊस झाला असून, मराठवाड्यात सरासरीपेक्षा ३६ टक्के, तर विदर्भात ३२ टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे. त्यामुळे मोठ्या पावसाअभावी राज्यातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये खरिपाच्या पेरण्या खोळंबल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे, तर काही ठिकाणी दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

जूनच्या सुरूवातीला दाखल होणाऱ्या पावसाने यंदा महिन्याच्या शेवटी आगमन केले. यानंतर १ ते ८ जुलै या आठवड्यात सरासरीच्या ३५ टक्के अतिरिक्त पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्याच्या सर्वच विभागांमध्ये सरासरीच्या कमी-जास्त प्रमाणात पाऊस झाल्याचे चित्र आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात कोकणामध्ये ८० टक्के, मध्य महाराष्ट्रात ३० टक्के, मराठवाड्यात ७९ टक्के, तर विदर्भात १६ टक्के पावसाची तूट आहे. कोकण आणि मराठवाड्यात गेल्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्याने जुलैच्या पहिल्या आठवड्यातील पावसाची सरासरी अतिरिक्त झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, लातूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, यवतमाळ येथे आठवड्याच्या सरासरीच्या अतिरिक्त पावसाची नोंद झाली आहे. परंतु बहुतांश जून महिना कोरडा गेल्यामुळे कोकण वगळता राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत आतापर्यंत एकत्रित पर्जन्यमान सरासरी खालीच आहे.

**राज्यातील १९ जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस**

जालना, अकोला, हिंगोली आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत सरासरीपेक्षा ६० टक्क्यांहून कमी पावसाची नोंद झाली आहे. पुण्यासह राज्यातील १९ जिल्ह्यात सरासरीपेक्षआ २० ते ५९ टक्के कमी पाऊस झाला आहे. असे असले तरी तरी पालघरमध्ये सरासरीपेक्षा ३८ टक्के पाऊस झाला आहे, तर कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग, तसेच नंदुरबार, धुळे आणि नाशिक या उत्तर मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या १९ टक्के कमी-अधिक पाऊस झाला आहे.

**तर कृषी विभागाला पर्यायी उपाययोजनेसाठी पावले उचलावी लागणार**



राज्यातील पर्जन्यमानाबाबत भारतीय हवामान विभागाने (IMD) म्हटले की, जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाने राज्यात दमदार हजेरी लावली आहे. मात्र, जून महिन्याच्या शेवटी पावसाने हजेरी लावल्यामुळे त्या काळात तूट मोठी आहे. त्यामुळे राज्याच्या बहुतांश जिल्ह्यातील एकूण पर्जन्यमान सरासरी खाली आहे. देशभरात मुसळधार पावसानं थैमान घातले असले तरी राज्यात बहुतेक ठिकाणी पाऊस सक्रिय नाही, तसेच पुढील काही दिवसांत मोठ्या पावसाची शक्यता नाही. पेरणीयोग्य पाऊस न झाल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी खरिपाच्या वेळापत्रकावर परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात मोठा पाऊस न झाल्यास कृषी विभागाला पर्यायी उपाय योजनेसाठी पावले उचलावी लागतील, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे.

# उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि दिल्लीत पावसाचे रौद्र रूप; पुरामुळे १३ जणांचा मृत्यू



नवी दिल्ली : राज्यात अद्याप पावसाने जोर धरलेला नसताना उत्तर भारतात पावसाने रौद्र रूप धारण केल्याचे पाहायला मिळत आहे. मागील २ दिवासंपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले असून आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर फक्त उत्तराखंडमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे. यात्रेकरूंनी भरलेली एसयूव्ही गंगेत पडल्याने सहा जणांचा मृत्यू झाला, तर काही अजूनही बेपत्ता असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय हिमाचल प्रदेश आणि दिल्लीमध्येही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, पंजाब आणि जम्मू-काश्मिरसह १२ राज्यांमधये पुढील ५ दिवसात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पाऊस, भूस्खलन आणि रस्ते अडवण्याच्या पार्श्र्वभूमीवर उत्तराखंड सरकारने इतर राज्यांतून येणाऱ्या पर्यटकांवर बंदी घातली आहे. तसेच राज्यातील १९५ रस्ते बंद करण्यात आले आहेत. याशिवाय नैनितालच्या जिल्हा प्रशासनाने १३ जुलैपर्यंत सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याची घोषणा केली आहे.

हिमाचल प्रदेशात गेल्या ३६ तासांत १३ भूस्खलन आणि नऊ पूर आले आहेत, ज्यामध्ये पाच लोकांचा मृत्यू झाला आहे आणि घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. चंदीगड-मनाली राष्ट्रीय महामार्गासह एकूण ७३६ रस्ते बंद करण्यात आले आहेत. तसेच पुढील दोन दिवस शाळा आणि महाविद्यालयेही बंद ठेवण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. पावसाचे अतिरिक्त पाणी सोडण्यासाठी पांडोह धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्यानंतर बियास नदी धोक्याच्या चिन्हावरून वाहत आहे.

राज्य आपत्कालीन ऑपरेशन केंद्राच्या माहितीनुसार, मुसळधार पावसाने मंडी, कुल्लू आणि लाहौल आणि स्पिती जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मनालीजवळील बहंग येथे अचानक आलेल्या पुरात अनेक दुकाने वाहून गेली, तर कुल्लू येथील पाटलीकुहलजवळ बियास पुरात एक बांधकाम सुरू असलेले घर बुडाले आहे.

रावी, बियास आणि सतलजसह सर्व प्रमुख नद्यांना पूर आला असून पर्यटकांना मुसळधार पावसात प्रवास टाळण्यास आणि नदीच्या पात्राजवळ न जाण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, मोहाली जिल्ह्यातील पुराचा सामना करण्यासाठी पंजाब सरकारने लष्कराची मदत मागितली आहे. रविवारी दिल्लीत गेल्या ४१ वर्षांतील जुलैमध्ये एका दिवसात सर्वाधिक १५३ मिमी पाऊस झाला. राष्ट्रीय राजधानीत गेल्या वेळी २५ जुलै १९८२ रोजी इतका पाऊस झाला होता. दरम्यान, आजपासून पावसाची तीव्रता कमी होणार असे हवामान विभागाने सांगितले आहे.

**पाऊस संपल्यावर निवडणुकीची रणधुमाळी सुरू होईल**

उद्धव ठाकरे म्हणाले की, मी सभांसाठी फिरत नाही तर कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी फिरत आहे. वर्षभर महाराष्ट्रातील कार्यकर्ते रोज मातोश्रीवर येत असतात, भेटत असतात. परंतु सर्वांना मातोश्रीवर येणं शक्य होत नाही. पाऊस संपल्यावर आपल्याकडे निवडणुकीची रणधुमाळी सुरू होईल. त्यामुळे कार्यकर्त्यांशी संवाद होणं महत्त्वाचे आहे. कारण आव्हानात्मक काळात जे कट्टर शिवसैनिक माझ्या सोबत आहेत, अशांना भेटणं हे माझं कर्तव्य आहे. म्हणून मी फिरायला सुरुवात केली आहे आणि संपूर्ण राज्यात फिरणार आहे, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

# देशात 'राईट टू रिकॉल'ची गरज; उद्धव ठाकरेंची मागणी

मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे दोन दिवसांसाठी विदर्भ दौऱ्यावर आहेत आणि त्यांनी पक्षबांधणीला सुरूवात केली आहे. आज त्यांच्या दौऱ्याचा दुसरा असून त्यांनी अमरावतीमध्ये पत्रकार परिषदेमध्ये 'राईट टू रिकॉल'ची मागणी केली आहे. तसेच त्यांनी अनेक मुद्यांवर भाष्य केले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, पुर्वी सरकार मतपेटीतून ठरत होतं, पण आता सरकार खोक्यातून जन्माला येत आहे. मतदान कोणालाही केलं तरी सरकार माझंच येणार, असा पायंडा पडला आहे. दमदाटी करून कोणीही देशाचा पंतप्रधान होऊ शकतो. त्यामुळे 'राईट टू रिकॉल' म्हणजेच लोकप्रतिनिधींनी जर चूक केली असेल, तर त्याला परत बोलवण्याचा अधिकार द्यायला पाहिजे का? यासंदर्भात देशात आता विचार व्हायला पाहिजे, असे वक्तव्य करत उद्धव ठाकरे यांनी 'राईट टू रिकॉल'ची एकप्रकारे मागणी केली आहे.

निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्याकडील शिवसेना हे पक्षाचं नाव आणि चिन्ह शिंदे गटाला दिलं. तेव्हापासून ठाकरे गटामध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. निवडणूक आयोगाच्या विरोधातील उद्धव ठाकरे यांच्या मनातील खदखद पुन्हा एकदा बाहेर आल्याचे पाहायला मिळाले. उद्धव ठाकरे म्हणाले की, पूर्वी पक्ष फोडले जायचे, त्यात काही नवीन नव्हतं. पण आता पक्षच पळवले जात आहेत. पक्षावरच दावा केला जात आहे. माझ्या वडिलांनी पक्षाला नाव दिलं होतं. ते नाव चोरलं आहे. पण मी ते जाऊ देणार नाही. नाव माझं आहे आणि माझंच राहील. मी नाव शिंदे गटाला देऊ देणार नाही. तो त्यांचा अधिकार नाही. ते चिन्ह देऊ शकतात, पण पक्षाचं नाव नाही. निवडणुकीत नियम पाळतो की नाही हे पाहणं आयोगाचं काम आहे. पक्षाचं नाव काढून घेणं हे काम नाही. उद्या आयोगाचं नाव आम्ही बदललं तर काय म्हणाल? असा प्रश्नही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, मी सभांसाठी फिरत नाही तर कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी फिरत आहे. वर्षभर महाराष्ट्रातील कार्यकर्ते रोज मातोश्रीवर येत असतात, भेटत असतात. परंतु सर्वांना मातोश्रीवर येणं शक्य होत नाही. पाऊस संपल्यावर आपल्याकडे निवडणुकीची रणधुमाळी सुरू होईल. त्यामुळे कार्यकर्त्यांशी संवाद होणं महत्त्वाचे आहे. कारण आव्हानात्मक काळात जे कट्टर शिवसैनिक माझ्या सोबत आहेत, अशांना भेटणं हे माझं कर्तव्य आहे. म्हणून मी फिरायला सुरुवात केली आहे आणि संपूर्ण राज्यात फिरणार आहे, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

# भारतात घुसखोरांच्या संख्येत वाढ? सीमा हैदरच्या घटनेमुळे प्रश्न ऐरणीवर

नवी दिल्ली : सीमा हैदर नामक पाकिस्तानी महिला प्रियकरासाठी भारतात आली आणि तिच्यामुळे भारतात अवैधरित्या घुसखोरी करणाऱ्यांबाबतचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गेल्या काही वर्षात अशा अनेक घटना घडल्या आल्या आहेत ज्यामध्ये पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांतून तिथले नागरिक हे अवैधरित्या भारतात घुसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या दोन्ही देशांमधून भारतात होणारी घुसखोरी हा चिंतेचा विषय बनत चालली आहे. म्हणून या घटनांवर कडक पावले उचलणे हे गरजेचे बनले आहे.

पबजी या ऑनलाइन गेममुळे भारतातील तरुण सचिन आणि पाकिस्तानातील चार मुलांची आई असलेली सीमा हैदर यांची दोघांची ओळख झाली. या मैत्रीचे रुपांतर हे प्रेमात झाले. ज्यानंतर ही महिला आता थेट पाकिस्तानातून भारतात येऊन पोहोचली आहे. एका चित्रपटासारखी असलेली ही प्रेमकथा सध्या भारतात सगळ्यांच्या चर्चेचा विषय ठरली आहे. पण यामुळे भारतात घुसखोरी करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याची माहिती समोर आली आहे. नेपाळमार्गे भारतात येणारी सीमा ही खुली असल्याने घुसखोरी करणाऱ्यांचे यामुळे फावले आहे. काही दिवसांपूर्वीच नेपाळमार्गे भारतात आलेल्या काही चिनी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले होते. पण नुकतेच समोर आलेले सचिन आणि सीमा हैदर यांच्या प्रकरणात पोलिसांनी सचिन, सीमा हैदर आणि सचिनच्या वडिलांना अटक केले होते. त्यानंतर त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडीत ठेवण्यात आले. ज्यानंतर त्या तिघांनाही जामीन देण्यात आला. सीमा हैदर ही नेपाळमार्गे भारतात आली, त्यानंतर ती सचिनला भेटली. यानंतर या दोघांनीही लग्नासाठी वकिलाशी चर्चा केली असता सीमाकडे व्हिसा नसून ती बेकायदेशीरपणे भारतात दाखल झाल्याचे उघडकीस आले. पण यामुळे वारंवार होणारी ही घुसखोरी राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर विषय बनत चालली आहे.

काही महिन्यांपूर्वी अगदी यासारखेच प्रकरण उघडकीस आल्याने खळबळ उडाली होती. सीमा प्रमाणेच इकरा नावाच्या पाकिस्तानी महिलेचे प्रयागराजमधील मुलायम सिंहसोबत प्रेमप्रकरण सुरू झाले. त्यानंतर ही महिला २०२२ पासपोर्ट आणि व्हिजा नसल्यामुळे काठमांडूच्या सीमेवरून भारतात आली. १९ वर्षीय इकरा आणि २६ वर्षीय मुलायम सिंह यांनी २०२२ मध्येच लग्न केले. परंतु ही घटना जानेवारी २०२३ मध्ये उघडकीस आली. ज्यानंतर बंगळुरु पोलिसांनी मुलायम सिंह आणि इकराला २३ जानेवारी २०२३ अटक केली. परंतु ही घटना उघडकीस येताच पोलिसांनी कारवाई करत इकराला पुन्हा पाकिस्तानात पाठवले.

दरम्यान, आता सर्वांच्या चर्चेचा विषय ठरलेली सीमा हैदर आणि सचिनच्या या घटनेत पोलिसांचा सीमावर संशय बळावला आहे. कारण सीमा ही केवळ पाचवी शिकली असून ती खूप चांगले इंग्रजी बोलते. याशिवाय तिला संगणकाचे देखील उत्तम ज्ञान आहे. त्यामुळे पोलिसांकडून तिचा मोबाईल जप्त करण्यात आला असून फॉरेन्सिक तपासणीसाठी लॅबमध्ये पाठवण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणात पाकिस्तानी हेरगिरीच्या दृष्टीकोनातूनही तपास करत आहेत.

# तुमच्या भाजपविरोधी भूमिकेचं काय झाले?

## बंडखोरी करणाऱ्यांना रोहित पवारांचा प्रश्न

पुणे : २ जुलै २०२३ या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात भूकंप झाला आणि पक्षात उभी फूट पडली. मागच्या रविवारी अजित पवार यांनी बंडखोरी करत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत त्यांच्या ८ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे आता शिवसेना पक्षाप्रमाणेच राष्ट्रवादीत देखील दोन गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे या दोन्ही गटाकडून आता एकमेकांवर शाब्दिक हल्ले करण्यात येत आहे. एकीकडे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे अजित पवार यांच्यासह त्यांच्या गटातील आमदारांवर टीका करत असतानाच आता पवारांचे नातू आणि कर्जत-जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रश्न उपस्थित केले आहेत. शरद पवार यांच्यासोबत राहून तुम्हाला पवार कळले नाही का? तुमच्या भाजपविरोधी भूमिकेचं काय झाले? असे म्हणत त्यांनी भाजपवर देखील टीका केली आहे.

शनिवारी (ता. ०८ जुलै) नाशिक जिल्ह्यातील येवल्यातून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुनर्बांधणीला सुरुवात केली. त्यानंतर आज आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी पुण्यातून पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, भाजपने योग्य पद्धतीने डाव खेळला आहे. बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना मराठी माणसासाठी अस्मिता जपण्यासाठी हा पक्ष काढला पण भाजपने हा पक्ष फोडला. आज संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशात भाजपविरोधात वातावरण आहे. त्याच्यावर कोणी बोलू नये. तर अनेक नेते आपापल्यांत गुंतून राहावे, यासाठी त्यांनी आधी शिवसेना आणि आता राष्ट्रवादी फोडली. त्यामुळे उत्तर-प्रत्युत्तर आम्ही आमच्यात देतोय आणि भाजप राहतोय बाजूला असे म्हणत रोहित पवारांनी भाजपवर आरोप केला.

अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. असे सगळ्यांकडून सांगण्यात येत असतानाच त्यांच्या ४-५ लोकांनी मिळून त्यांना व्हिलन बनवल्याचा आरोप रोहित पवार यांच्याकडून करण्यात आला आहे. याबाबत बोलताना ते म्हणाले की, त्या बाजूला पक्ष फुटण्याचे सहज खापर हे अजित पवार यांच्यावर फोडण्यात आले. नाशिकमधल्या फोटोवर दुर्दैवाने अजित पवार यांचा फोटो देखील नव्हता. त्यामुळे या सगळ्या गोष्टींमध्ये अजित पवार यांना ४-५ लोकांकडून व्हिलन बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अजित पवारांनी घेतलेला निर्णय हा कोणालाच पटलेला नाही. पण हे जे राजकारण सुरू आहे त्याची मजा बघण्याचे काम भाजपकडून करण्यात येत आहे. या घडणाऱ्या गोष्टींमुळे आम्ही आमच्यात भांडतोय, असे म्हणत रोहित पवार यांनी खंत व्यक्त केली.

यावेळी रोहित पवार यांनी पक्ष फुटीवर बोलताना काही प्रश्न्न उपस्थित करत अजित पवार आणि त्यांच्या गटातील आमदारांच्या भाजपविरोधी भूमिकेवर प्रश्न्न उपस्थित केला आहे. ही लढाई भूमिकेची आहे. अस्मितेची आहे. हे जे काही लोकं भाजपसोबत गेले आहेत. भाजपच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत, यांनी आधी पवारांच्या विचारात राहून भाजपच्या भूमिकेला विरोध केला. अनेक मोठमोठी भाषण करत त्यांच्या विरोधातील भूमिका घेतली आहे. जेव्हा महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यावेळी वेगवेगळ्या ठिकाणी अपमान करण्यात आला तेव्हा आमच्यासोबत त्यांनी भाजपच्या विरोधात, सत्ताधाऱ्यांच्या विरोधात भूमिका घेतली. पण आज तात्पुरती सत्ता मिळावी, यासाठी भूमिका आणि विचार सोडत असाल तर तुमच्या त्या भूमिकेचं काय झाले? असा प्रश्न रोहित पवार यांच्याकडून विचारण्यात आला आहे.

निर्णय घेताना, आम्ही विकासासाठी निर्णय घेतला असं बोलतात. पण पदं होती, तेव्हा विकास केला नाही?. ही स्वाभिमान, अस्मितेची लढाई आहे. एका विचाराची लढाई आहे असे सांगत रोहित पवार म्हणाले की, जेव्हा या घडामोडी घडत होत्या, तेव्हा माझ्या आई-वडिलांनी मला एकच प्रश्न विचारला. जेव्हा आम्ही वयस्कर होऊ, ८० च्या पुढे जाऊ, तेव्हा तू अशीच भूमिका घेशील का? जर माझ्या आई-वडिलांना हा प्रश्न पडला असेल, तर सामान्य कुटुंबातील अनेक आई-वडिलांना हा प्रश्न पडला असणार. हा किस्सा देखील रोहित पवार यांच्याकडून सांगण्यात आला आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## वारंवार दुखतात का सांधे? या जीवनसत्त्वाची असू शकते कमतरता, ही लक्षणे पाहून ओळखा


Image Credited - Doctor NDTV

शरीर निरोगी ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे आपल्या शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतात. ते आपले शरीर आतून मजबूत करतात. जरी आपल्या शरीरात अनेक जीवनसत्त्वे स्वतःच तयार होत असली, तरी जी जीवनसत्त्वे शरीराला निर्माण करता येत नाहीत, ती आपण बाहेरून पुरवतो. तथापि, जेव्हा आपण ते योग्यरित्या पूर्ण करू शकत नाही, तेव्हा शरीराला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हात-पाय दुखण्याची समस्या काही जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे होऊ शकते. याबद्दल तज्ज्ञांकडून सविस्तर माहिती घेऊया.

तज्ज्ञांच्या मते शरीराला सर्व प्रकारची जीवनसत्त्वे आवश्यक असली तरी रोगप्रतिकारशक्ती वाढवून शरीराला आजारांपासून दूर ठेवण्यासाठी व्हिटॅमिन डी महत्त्वाची भूमिका बजावते. हे आपली हाडे, स्नायू आणि दात निरोगी ठेवण्यास मदत करते. शरीरातील हाडांपर्यंत कॅल्शियम पोहोचवण्याचे काम देखील व्हिटॅमिन डी करते.

आकडेवारी पाहता, भारतातील ७० ते ९० टक्के लोक व्हिटॅमिन डीच्या कमतरतेने त्रस्त आहेत, त्यामुळे त्यांना हाडांशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागत आहे. शरीरात व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे केवळ सांधे दुखतात असे नाही, तर तुमच्या अनेक क्रियाकलापांवरही परिणाम होतो. त्याला सनशाईन व्हिटॅमिन असेही म्हणतात. सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येऊन आपले शरीर व्हिटॅमिन डी बनवते, परंतु आजकाल लोक ऑफिसमध्ये जास्त वेळ घालवतात, ज्यामुळे त्यांना खूप कमी सूर्यप्रकाश मिळतो, ज्यामुळे त्यांच्यात व्हिटॅमिन डीची कमतरता असते.

**व्हिटॅमिन डीचे स्रोत**

तळलेला मासा
अंड्यातील पिवळ बलक, लाल मांस आणि लिवर
कॉड माश्याच्या लिवचे तेल
अक्खे तांदुळ
सोयाबीन
डाळी
दूध
दही
अंडी
सकाळी काही मिनिटे उन्हात उभे राहणे

**व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे या समस्या होतात-**

हाडांमध्ये वेदना
व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे जखम भरण्यासही बराच वेळ लागतो.
कायम थकवा जाणवणे
नेहमी हताश, तणाव किंवा चिंता वाटणे
व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे केस गळतात
शरीरात व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होतात.
वारंवार आजारी पडणे
व्हिटॅमिन डीचा तुमच्या त्वचेवरही परिणाम होतो

## महिलांमध्ये किडनीच्या आजाराची ही असू शकतात ५ कारणे, आजच ओळखा लक्षणे




Image Credited - Health Jade

वाईट जीवनशैलीमुळे आजकाल अनेक आजार आपल्याला आपल्या कवेत घेतात. धावपळीच्या जीवनामुळे आपण आपल्या जीवनशैलीकडे आणि आहाराकडे लक्ष देऊ शकत नाही, त्यामुळे बीपी, मधुमेह असे अनेक आजार आपल्या अवतीभवती आहेत. यांपैकी एक म्हणजे किडनी स्टोन.

सध्या किडनी स्टोन ही एक धोकादायक समस्या म्हणून उदयास येत आहे. ही समस्या महिलांमध्ये अधिक दिसून येते. एका संशोधनानुसार पुरुषांमध्ये किडनीच्या आजाराचा धोका १२ टक्के आणि महिलांमध्ये १४ टक्के असतो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (थकज) नुसार, ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना किडनीचा आजार होण्याची शक्यता जास्त असते. महिलांमध्ये किडनीच्या आजाराची काही कारणे असू शकतात, ज्याकडे दुर्लक्ष करू नये.

**किडनीच्या आजाराची लक्षणे-**

भूक न लागणे
थकवा येणे, अशक्तपणा जाणवणे
मळमळ आणि उलट्यासारखे वाटणे
स्नायू दुखणे
क्रॅम्पिंग, ताणल्यासारखे वाटणे
रात्री वारंवार लघवी होणे
वजन कमी होणे
सूजलेले घोटे किंवा पाय
धाप लागणे
लघवीमध्ये रक्त
निद्रानाश
त्वचेची खाज सुटणे, कोरडेपणा
डोळ्याभोवती सूज येणे
त्वचेमध्ये कोरडेपणा आणि खाज सुटणे

महिलांमध्ये किडनीच्या आजाराची प्रमुख कारणे-

**गर्भधारणा**

काही आरोग्य तज्ञांच्या मते, गर्भधारणेमुळे महिलांना किडनीशी संबंधित समस्या देखील असू शकतात. गरोदरपणात महिलांच्या किडनीवर दबाव येतो, त्यामुळे त्याच्या कामात अडथळा निर्माण होतो. अशा स्थितीत किडनीशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आजकाल लोकांमध्ये णढख ची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. हे पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त दिसून येते. यूटीआयच्या समस्येमुळे किडनीशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत जर तुम्हाला णढख ची समस्या भेडसावत असेल तर लगेच डॉक्टरांना दाखवा, अन्यथा हा त्रास वाढून किडनीचा आजार होऊ शकतो.

**मधुमेह**

मधुमेहामुळे किडनीशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. अनेक वेळा आपल्या रक्तातील साखर खूप वाढते आणि आपण ती दीर्घकाळ टाळतो. अशा परिस्थितीत ते किडनीशी संबंधित समस्यांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्याचा प्रयत्न करा.


**हार्मोनल असंतुलन**

महिलांमध्ये हार्मोनल असंतुलन खूप आहे. अशा परिस्थितीत महिलांमध्ये पीसीओएस झाल्यानंतरही दीर्घकालीन किडनीच्या आजाराचा धोका वाढतो. योग्य जीवनशैलीसह निरोगी आहार आणि व्यायाम करण्याचा प्रयत्न करा.

## पावसाळ्यात तुम्हाला वारंवार सुस्तावल्यासारखे वाटते का? हे पदार्थ तुम्हाला ठेवतील ऊर्जावान

तुम्हाला दिवसभरात वारंवार डुलकी लागते किंवा तुम्हाला अंथरुणातून उठणे कठीण जात आहे का? तुमच्यासोबतही असे घडत असेल, तर त्यासाठी स्वत:ला दोष देणे थांबवा. कारण बाहेरचे हवामान तुम्हाला फ्रेश वाटण्यापासून रोखत आहे. तरीही पावसाळ्यात आळशीपणा वाटणे स्वाभाविक आहे.

पण तुम्हाला माहीत आहे की तुमच्या अन्नाचाही खूप प्रभाव पडतो. तुम्ही रोज जे खातात त्याचा तुमच्या शरीराच्या उर्जेच्या स्तरावर परिणाम होतो, ज्यामुळे तुम्ही दिवसभर सक्रिय राहता. पावसाळ्यात लोक भजी, समोसे असे तळलेले पदार्थ खाण्यास प्राधान्य देतात. जास्त फॅट आणि कर्बोदके असलेले हे पदार्थ खाल्ल्याने शरीरात ऊर्जेची कमतरता निर्माण होऊ शकते. चला जाणून घेऊया पावसाळ्यात कोणते पदार्थ खाल्ल्याने तुम्हाला उत्साही वाटू शकते.


Image Credited - India.com

**मसाला चहा**

साधारणपणे मसाला चहामध्ये लवंग, दालचिनी, वेलची आणि आले यासारख्या गोष्टी वापरल्या जातात. हे पोषक घटक शरीराचे पोषण करतात आणि रोगांशी लढण्यासाठी आपली प्रतिकारशक्ती देखील मजबूत करतात. याशिवाय चहामध्ये असलेले कॅफिन आपल्याला ताजेतवाने वाटते.

**सूप**

पावसाळ्यात सूप पिणे देखील फायदेशीर ठरू शकते. सूप केवळ चवदारच नाही, तर ते आपल्या शरीराला आवश्यक द्रव आणि पोषक घटक देखील प्रदान करते, ज्यामुळे आपली ऊर्जा पातळी वाढते.

**खिचडी**

डाळ हे पोषक तत्वांचे भांडार आहे. योग्य प्रमाणात भातासोबत घेतल्यास ते तुम्हाला ऊर्जावान ठेवू शकते. एकत्र खाल्ले तर ते पोषणाचे पॉवरहाऊस बनतात. पावसाळ्यात खिचडी खाल्ल्याने तुमची उर्जा परिपूर्ण राहते.

**प्रोबायोटिक्स**

आपल्या ऊर्जेच्या पातळीचा आपल्या आतड्यांच्या आरोग्यावर मोठा प्रभाव पडतो. योग्य पचन आणि चयापचय आपल्याला दिवसभर निरोगी, आनंदी आणि सक्रिय ठेवण्यास मदत करते. त्यामुळे पावसाळ्यात गॅस, ॲसिडिटी आणि आतड्यांसंबंधीच्या समस्यांपासून दूर राहण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात पुरेशा प्रमाणात प्रोबायोटिक्सचा समावेश करावा.



## दात चांगले ठेवायचे असेल तर असे करणे टाळा...

पांढरे शुभ्र आणि स्वच्छ चमकदार दात हवे असे सगळ्यांना वाटत असतं. चांगले दात चांगल्या आरोग्याचे सूचक असतात. आपल्याला सौंदर्यामध्ये भर पडतात. चांगले दात व्यक्तिमत्त्वाला आकर्षक करते. पण हे दातच चांगले नसतील तर काय? चांगला चेहरा असेल आणि दात चांगले नसतील तर लोक नाव ठेवतात. लहानपणी तर किडलेले आणि खराब दात आपोआपच पडून जातात. पण मोठे झाल्यावर असे होत नाही. चांगले आणि स्वच्छ दात ठेवण्यासाठी हे करणे टाळावे...

अती थंड वस्तूंचे सेवन करणे - चांगल्या दातांसाठी अती थंड वस्तूंचे सेवन करणे टाळावे. थंड वस्तूंचे सेवन केल्याने दाताला इजा होण्याची शक्यता असते आणि दात खराब होऊ शकतात.

दातांचा साह्याने रॅपर खोलणे - बऱ्याचशा लोकांची सवय असते दाताने रॅपर फाडतात किंवा बाटलीचे झाकण उघडतात. असे करू नये. असे केल्याने दात कमजोर होतात आणि दात त्यांची चमक जाते.

दातांची मसाज करणे - काही लोक जोरा जोरात दात घासतात आणि बराच वेळापर्यंत घासतात, असे करू नये. ह्यामुळे हिरड्यांना इजा होते. दात लवकर खराब होतात.

दाताने पेन- पेन्सिल चावणे - काही लोक आणि खास करून लहान मुलं त्यांना सवय असते दाताने पेन किंवा पेन्सिल चावतात, असे केल्याने दाताला इजा होते आणि दात कमजोर होतात.

दात घासण्याचा कंटाळा करणे - लहान मुलं दात घासण्याचा कंटाळा करतात. त्यामुळे दात किडतात आणि लवकर खराब होतात. बरेच मोठी माणसं देखील दात घासत नाही त्यामुळे त्यांचा तोंडाला उग्र वास येतो आणि दात खराब होतात.

## तुम्हालाही दररोज लिपस्टिक लावण्याची सवय असेल तर नक्की जाणून घ्या त्याचे तोटे

सुंदर दिसण्यासाठी मुली अनेक गोष्टी करतात. त्यांच्या त्वचेची विशेष काळजी घेण्यापासून ते विविध सौंदर्य उत्पादने वापरण्यापर्यंत, महिला प्रत्येक प्रसंगासाठी परफेक्ट लुक मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करतात. लिपस्टिक हे सौंदर्य



वाढवण्यासाठी वापरल्या जाणार्या उत्पादनांपैकी एक आहे. हे लावल्याने मेकअप तर पूर्ण होतोच, पण चेहऱ्यावर एक वेगळीच चमकही येते.

जवळजवळ प्रत्येक मुलगी परफेक्ट लूकसाठी लिपस्टिक वापरते, तसेच अनेक महिला दररोज मेकअप करत नसल्या तरी त्यांना लिपस्टिक लावण्याची सवय असते. परंतु तुम्हाला माहित आहे का की रोज लिपस्टिक वापरणे तुमच्यासाठी खूप हानिकारक ठरू शकते. कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या अभ्यासानुसार, बहुतेक लिप ग्लॉस आणि लिपस्टिकमध्ये क्रोमियम, शिसे, ॲल्युमिनियम, कॅडमियम सारखी रसायने असतात. अशा परिस्थितीत, त्याचा सतत वापर केल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात. जाणून घेऊया रोज लिपस्टिक लावण्याचे तोटे-

**कोरडेपणा आणि फाटलेले ओठ**

लिपस्टिकमध्ये अनेक रंगद्रव्ये, संरक्षक आणि सुगंध असतात, ज्यामुळे ओठ कोरडे होऊ शकतात. अशात योग्य मॉइश्चरायझेशनशिवाय लिपस्टिकचा सतत वापर केल्याने ओठ कोरडे आणि फाटलेले होऊ शकतात.

**ॲलर्जी धोका**

बऱ्याच लोकांना लिपस्टिकमध्ये असलेल्या सुगंध, रंग किंवा संरक्षक यांसारख्या विशिष्ट घटकांवर ऍलर्जी होण्याची शक्यता असते. या ऍलर्जीमध्ये सौम्य चिडचिड ते सूज, लालसरपणा किंवा खाज सुटणे यासारख्या गंभीर लक्षणांपर्यंत असू शकतात.

**ओठांचा नैसर्गिक रंग कमी होणे**

विशिष्ट लिपस्टिक वापरणे, विशेषत: गडद किंवा दीर्घकाळ टिकणाऱ्या लिपस्टिक, तुमच्या ओठांचा नैसर्गिक रंग काढून टाकू शकतात. ही समस्या विशेषतः उद्भवते जेव्हा दिवसाच्या शेवटी लिपस्टिक पूर्णपणे काढून टाकली जात नाही.

**शरीरातील हानिकारक पदार्थांचे नुकसान**

काही लिपस्टिकमध्ये असे घटक असू शकतात जे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. अशा परिस्थितीत त्याच्या सतत वापरामुळे हे हानिकारक घटक आपल्या शरीरात जातात, ज्यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक गंभीर समस्यांचा धोका वाढतो.

**मेंदूला हानिकारक**

तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की लिपस्टिकचा सतत वापर केल्याने आपल्या मेंदूच्या आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. त्यात असलेले शिसे नावाचे रसायन न्यूरल इजा होऊ शकते. एवढेच नाही तर शिशामुळे स्मरणशक्ती कमकुवत होणे, नर्व्ह ट्रान्समिशनवर परिणाम होणे आणि एकाग्रता कमी होणे यासारख्या समस्याही उद्भवू शकतात.

## डोळ्यांवरील सूज कमी करण्यासाठी ५ नैसर्गिक पद्धत



डोळे हा शरीराचा सर्वात नाजूक भाग आहे. डोळ्यांना थोडा त्रास झाला तरी धोकादायक असतो. अनेकदा झोपेतून उठल्यानंतर डोळ्यांना सूज येते आणि काहीवेळा दीर्घकाळ स्क्रीन टाइममुळेही असे होऊ शकते. या समस्येला पफी डोळे असेही म्हणतात. प्रत्येकाला कधी ना कधी या समस्येचा सामना करावा लागला असेल. ही एक सामान्य समस्या आहे. पण जास्त वेळ राहिल्याने डोळ्यांचा त्रास होऊ शकतो. या समस्येवर मात करण्यासाठी आजकाल बाजारात अनेक प्रकारची उत्पादने उपलब्ध आहेत. महाग असण्याव्यतिरिक्त ही उत्पादने कधीकधी इच्छित परिणाम देत नाहीत. अशा परिस्थितीत आज आम्ही तुम्हाला अशाच काही नैसर्गिक उपायांबद्दल सांगत आहोत. जे केल्याने फुगलेल्या डोळ्यांची समस्या दूर होईल आणि काळी वर्तुळे देखील दूर होतील. फुगलेल्या डोळ्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठीच्या नैसर्गिक उपायांबद्दल जाणून घेऊया.

कोल्ड कंप्रेस : कोल्ड कंप्रेस पफी आइजची समस्या दूर करण्यास मदत करतं. असे केल्याने रक्तवाहिन्यांना थंडावा मिळतो. त्यामुळे डोळ्यांची सूज दूर होते. कोल्ड कॉम्प्रेसमुळे काळी वर्तुळेही कमी होतात. कोल्ड कॉम्प्रेस करण्यासाठी तुम्ही कापसाचे कापड किंवा रुमाल थंड पाण्याने धुवून डोळ्यांखाली लावू शकता. असे केल्याने डोळ्यांना आराम मिळेल आणि सूज दूर होईल.

टी बॅग : टी बॅगने चहा तर आपण तयार केलाच असेल पण तुम्हाला माहिती आहे का की यामध्ये आढळणारे अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म डोळ्यांची सूजही दूर करतात. ते वापरण्यासाठी चहाची पिशवी भिजवून अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवा, नंतर ५ ते १० मिनिटे डोळ्यावर ठेवा. असे केल्याने सूज कमी होईल आणि काळी वर्तुळे देखील कमी होतील.

काकडी : काकडी शरीरासाठी फायदेशीर असते. ते त्वचेला थंड करते आणि जळजळ काढून टाकते. ताजी काकडीचे तुकडे करा. आता हा काकडीचा तुकडा काही वेळ डोळ्यांवर ठेवा. असे केल्याने डोळ्यांना आराम मिळेल आणि सूज कमी होईल.

झोप : कमी झोपेमुळे डोळ्यांच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. डोळ्यांची सूज दूर करण्यासाठी रात्री सात ते आठ तासांची झोप घ्यावी. असे केल्याने डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी होतील आणि सूज दूर होईल. पुरेशी झोप घेतल्याने तणावही कमी होतो.

हायड्रेट रहा : डोळ्यांची सूज दूर करण्यासाठी हायड्रेटेड राहणे देखील खूप महत्वाचे आहे. दिवसातून दोन ते तीन लिटर पाणी पिण्याचा प्रयत्न करा. असे केल्याने शरीर डिटॉक्स करण्यासोबतच डोळ्यांची सूज दूर होते. यासोबतच योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने अनेक आजार दूर होतात.

टीप: डोळ्यांची सूज दूर करण्यासाठी या नैसर्गिक उपायांची मदत घेतली जाऊ शकते. तथापि हे उपाय करण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला देखील घ्या.

## स्वत:ला भावनिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी ५ गोष्टी लक्षात ठेवा

मानसिक आणि भावनिकदृष्ट्या मजबूत असण्याचा अर्थ असा आहे की तुम्ही कितीही तणावात असलात तरीही तुम्ही सामान्यपणे वागू शकता. जर तुम्ही कठीण परिस्थितीत भावनिकदृष्ट्या खंबीर असाल तर योग्य काय ते ठरवणे सोपे जाते. इतर लोकांच्या तुलनेत तुमचा दृष्टीकोन योग्य असल्यास, संवाद स्पष्ट असल्यास तुम्ही तुम्हाला हवे ते साध्य करू शकता. त्यामुळे भावनिकदृष्ट्या मजबूत होण्यासाठी तुम्हाला या सवयींवर काम करावे लागेल.

**ऐकण्यावर विश्वास ठेवू नका**

जर तुम्हाला तिसर्या व्यक्तीकडून काही कळले तर त्याच्यावर आंधळेपणाने विश्र्वास ठेवू नका. जर ते तुमच्याशी संबंधित असेल, तर ज्या व्यक्तीने हे सांगितले त्या व्यक्तीशी समोरासमोर बोला. वेगवेगळ्या गोष्टी मनात ठेवल्याने तुमचे मनच बिघडत नाही तर नातीही बिघडतात.

**प्रतिक्रिया देणे टाळा**

झटपट प्रतिक्रिया केवळ स्वसंरक्षणातच चांगली असते, ती



नातेसंबंधांमध्ये दुरावण्याचे कारण बनू शकते. त्यामुळे जर तुम्हाला कोणाचा दृष्टिकोन कळत नसेल, तर त्यावर वाद घालून तुमचा मूड खराब करण्याऐवजी हलकेच हसून निघून गेलेले बरे. कोणतीही परिस्थिती तुमच्यावर वर्चस्व गाजवू देऊ नका.

**लोक काय विचार करतात याची काळजी घेणे थांबवा**

लोक काही म्हणतील हे ठरवणे लोकांचे काम आहे. त्यामुळे असा विचार करून स्वत:वर भार टाकू नका. तुम्हाला जे पाहिजे ते करा. तुम्हाला आनंदी आणि आराम देणार्या गोष्टी करण्यासाठी कोणाचीही वाट पाहण्याची गरज नाही. इतरांच्या बोलण्यात किंवा त्यांच्याबद्दल विचार करून स्वतःला त्रास देऊ नका, कारण बर्याच वेळा नंतर खूप पश्चात्ताप होतो.

**स्वत:वर लक्ष केंद्रित करा**

स्वतःला भावनिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी स्वतःवर लक्ष केंद्रित करा. तुम्हाला करायला आवडते असे काहीतरी ओळखा. मग तो तुमचा कोणताही छंद पूर्ण करण्याचा असो, फिटनेसला सुरुवात करणे असो किंवा मित्रांसोबत लांबच्या सहलीला जाणे असो.

**व्यक्तिमत्व लवचिक बनवा**

तुमचा विचार करण्याची, समजून घेण्याची आणि जग पाहण्याची पद्धत बदला. ज्यावर बोलणे कठीण होईल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल मनात असे विचार निर्माण करू नका.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
सोमवार १० जुलै २०२३


## मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला, शिवसेनेच्या ४ मंत्र्यांना डच्चू? एकनाथ शिंदेंसमोर पेच

मुंबई : या सरकारचा पावसाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री उपमुख्यमंत्रीनी दिली आहे. १७ जुलैपासून पावसाळी अधिवेशन होणार असल्याने या आठवड्यात मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळात आपले नाव असेल का, याची उत्सुकता शिवसेना भाजप नेत्यांमध्ये पहिला मिळत आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ आमदारांनी मंत्री पदाची शपथ घेतल्याने आता पालकमंत्री पदाची माळ गळ्यात पडते की नाही, याची वाटत बघत आहेत. या मंत्रिमंडळात १४ मंत्र्याचा समावेश होणार असल्याची माहिती भेटत आहे.



प्रभुराज प्रतिष्ठान लातूरच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय खाडगाव रोड लातूर येथील विद्यार्थ्यांना छत्री वाटप करण्यात आले.

# जानाईश्री पुरस्काराने डॉ. कैलास शर्मा सन्मानित



लातूर : टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई येथे प्राध्यापक ते संचालक या पदावर कार्यरत असलेले डॉ. कैलाश शर्मा यांना डॉ. गोपीकीशन भराडीया व कृषितज्ञ बी.बी.ठोंबरे यांच्या हस्ते डॉक्टर जानाईश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराचे स्वरूप होते शाल, पुष्पहार, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, सरमोक्षगुंडम् विश्र्वेश्र्वरय्या यांची पगडी व रू २५,०००/-चा धनादेश. यावेळी व्यासपीठावर जानाई सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षा डॉ.गौरी कुलकर्णी, कार्याध्यक्ष सि.ए.दिलीप रांदड, सचिव अमोल बनाळे, जानाई विद्यार्थी मंडळाचा अध्यक्ष गौरव कुलकर्णी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ.गौरी कुलकर्णी यांनी केले, डॉ.भराडीया यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.आरती संदिकर यांनी डॉ.भराडीया यांचा, डॉ.वैशाली टेकाळे यांनी डॉ.कैलाश शर्मा यांचा तर संजय अयाचित यांनी बी.बी.ठोंबरे यांचा परिचय करून दिला. पुरस्कार वितरणानंतर सन्मान पत्राचे वाचन अभि.गीता ठोंबरे यांनी केले. डॉ.शाम कुलकर्णी व डॉ. श्रीनिवास संदिकर यांनी डॉ.भराडीया तर डॉ.विश्र्वास कुलकर्णी व डॉ.मनोज शिरूरे यांनी बी.बी.ठोंबरे याचा यथोचित सत्कार केला.

अर्थिक अडचण असलेल्या मेडीकलच्या गरजू विद्यार्थ्याच्या प्रवेश शुल्का साठी लातूरातील डॉक्टरांनी जानाई सारखी संस्था स्थापन करावी अशी अपेक्षा डॉ. कैलाश शर्मा यांनी पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केली. पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे यांनी डॉ.कैलाश शर्मा यांना चित्रफिती द्वारे शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप कृषिरत्न बी.बी.ठोंबरे यांनी केला अमोल बनाळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनुपमा पाटील यांनी केले डॉ.मंजुषा कुलकर्णी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

डॉ.अशोक गानू , डॉ.अशोक अरदवाड, डॉ.महेश देवधर, डॉ.अरूणा देवधर, डॉ.राजेश पाटील, डॉ.पि.के.शहा, डॉ.बी.आर.पाटील, डॉ.खंडापूरकर, डॅ.जटाळ, डॉ.दिलीप देशपांडे, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अनंत निरगुडे, विनोद कुचेरीया, आशाताई भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पृथ्वी तलावरून गेल्यानंतर ज्यांची चर्चा समाजात होते तो वैकुंठाला जातो

## ह.भ.प.श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर महाराज



लातूर : जीवनात सुख आणि दुःखात भगवंतांच्या नामस्मरणात राहण्याचा मंत्र जगतगुरु संत तुकाराम महाराज यांनी दिला. कलयुगतील आयुष्य मौल्यवान आहे. त्यामुळे आपण कसे जगतो हे महत्त्वाचे आहे. या पृथ्वीतलावरून गेल्यानंतर ज्या व्यक्तीची समाजात चर्चा राहते ती व्यक्ती वैकुंठाला जाते. असे भावपूर्ण विचार ह.भ.प. बापूसाहेब मोरे-देहूकर यांनी व्यक्त केले.

माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे प्रमुख व थोर शिक्षणतज्ञ विश्र्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या सहचारिणी व माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे कार्याध्यक्ष राहुल वि. कराड यांच्या मातोश्री ज्येष्ठ कवयित्री, लेखिका,तत्वदर्शी प्रज्ञावंत वै.सौ.उर्मिला वि. कराड यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

तत्पूर्वी माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे कार्याध्यक्ष राहुल वि. कराड यांनी धार्मिक वैदिक विधिवत पूजा केली. या वेळी ह. भ. प. तुळशीराम दा. कराड, काशिराम दा. कराड, डॉ. मंगेश तू. कराड, डॉ. अदिती कराड, आमदार रमेशअप्पा कराड, राजेश कराड, सुनील कराड सहीत संपुर्ण कराड परिवारातील सदस्य उपस्थित होते. तसेच समाजातील राजकीय शैक्षणिक अध्यात्मिक स्तरातील हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प.श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर महाराज म्हणाले, जीवनात ज्यांनी पुण्य संपादन केलं त्यांच्याच जीवनात पुण्यस्मरण घडत. हे भाग्य उर्मिला कराड यांना लाभले. त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत अध्यात्माची साथ सोडली नाही. वारी पूर्ण केल्यानंतरच त्यांनी आपला देह सोडला. हे भाग्याचे लक्षण आहे. मनुष्य जेव्हा जातो तेव्हा तो आपल्या गुणांनी व कीर्तीमानाने मागे राहतो. मृत्यू अटळ असला तरी त्याला गोड करावे असे तुकाराम महाराज सतत सांगत असे. रामायणामध्ये सर्व प्रकारच्या प्रेमाचे नाते सापडतात. त्याचाच बोध घेऊन आपण जीवन व्यतीत करावे. वै.सौ. उर्मिला कराड यांनी एमआयटीच्या नावलौकिकात व उभारणीत मोलाचे योगदान दिले आहे.

विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या उर्मिला यांचा कराड घराणे घडविण्यास मोठा वाटा आहे. दोन पिढ्यांवर सुसंस्कार करण्याचे महान कार्य केले आहे. आज त्यांनी दाखविलेल्या अध्यात्मिक मार्गावर चालण्याचा प्रयत्न नवी पिढी करीत आहे. त्यांच्या प्रथम पुण्य स्मरणावर येथे आलेले सर्व भाविक भक्ताचा आम्हाला मोठा आधार आहे. तसेच जगातील सर्वात मोठया डोममधून वैष्णव परंपरा संपुर्ण जगात पोहचन्याची महिती दिली.

या प्रसंगी लक्ष्मण महाराज व महेश महाराज यांनी उर्मिला काकू बद्दल भावपूर्ण आदरांजली वाहिली.

यावेळी ह.भ.प. डॉ.सुदाम महाराज पाणेगावकर, लक्ष्मण महाराज, नारायण महाराज, किसन महाराज, तुकाराम महाराज शात्री, महेश महाराज, पंडित उद्धव बापू आपेगाकर, कोकाटे महाराज, भगवान महाराज कराड, बाबा महाराज पाडगावकर, पांचाळ महाराज, गणपत महाराज जगताप, डॉ. पठाण आणि डॉ. हरी नरके यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# वर्षापासून बेपत्ता मुलीस लातूर पोलिसांनी शोधले

लातूर : कासार सिरशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २०२२ मध्ये एका अल्पवयीन तरूणीचे अपहरण झाल्याचा गुन्हा दाखल होता. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी याबाबत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक (AHTU) पथकाला योग्य मार्गदर्शन केल्यानंतर त्या पथकाला तब्बल १ वर्षानंतर मुलीचा शोध घेण्यात यश आले आहे.

सन २०२२ मध्ये पोलीस ठाणे कासारशिरसी येथे एका अल्पवयीन मुलीचा अपहरण झाल्याच्या तक्रारीवरून भादवि कलम ३६३ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून कासारशिरसी पोलीस स्टेशनचे पोलीस नमूद मुलीचा शोध घेत होते परंतु ती मिळून येत नव्हती.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी बऱ्याच कालावधीपासून तपासावर असलेले व आतापर्यंत मिळून न आलेल्या मुला-मुलींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला (AHTU) आदेशित करून सूचना व मार्गदर्शन केले होते.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख व पोलीस निरीक्षक सुभाष सूर्यवंशी हे त्यांच्या पथकामार्फत गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते.

सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना अपहरण झालेल्या मुलीचा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जाऊन शोध घेतला तसेच सायबर सेलच्या मदतीने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून मिळालेल्या माहितीवरून सदर मुलीचा शोध घेऊन तीच्यसोबत असलेल्या इसमासह पोलिस ठाणे कासारशिरसी येथे हजर करण्यात आले आहे. पुढील तपास कासारशिरसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रियाज शेख हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी पोहेका योगी, मापोना गिरी, चालक बुढे तसेच सायबर सेल यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

## प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांचा सत्कार

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांची स्वारातीम विद्यापीठाच्या विद्यापरिषद सदस्यपदी कुलगुरू यांच्या नामनिर्देशनानुसार राज्यपाल महोदयांनी नियुक्ती केलेली आहे. त्याबद्दल वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वतीने उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या हस्ते त्यांचा शाल व बुके देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या निवडीबद्दल डॉ. युवराज सारणीकर, डॉ. रवी सोळुंके, डॉ.चंद्रशेखर स्वामी, डॉ.महेश बेंबडे, डॉ.आण्णाराव चौगुले, डॉ. विजेंद्र चौधरी, प्रा. मेघा पंडित, डॉ.राहुल मोरे, डॉ. रोहिणी शिंदे, ग्रंथपाल प्रा.किरण भिसे, डॉ. कोमल गोमारे, डॉ. मनीषा गुरमे, डॉ.श्याम इबाते, डॉ. विश्वनाथ मोटे, डॉ. आर. कीर्तने, डॉ.नंदिनी कोरडे, डॉ.जमन अंगुलवार, डॉ.रवींद्र शिंदे, डॉ.महादेव पंडगे, डॉ. श्रेयस माहुरकर, डॉ.संगीता जाजू,प्रा.श्र्वेता लोखंडे, प्रा.शिवाजी आळणे,डॉ.नाथराव केदार, डॉ.गजानन बने, डॉ.रामशेट्टी शेटकार, प्रा.राहुल जाधव, डॉ.मुजावार, डॉ.शंकर बिराजदार, प्रा.शिलेश गावित, डॉ.महेश करळे, प्रा.सुरज कोल्हे, डॉ.अमोल ठोसर, डॉ. दीप्ती ढेरे, प्रा.आञाम, प्रा.शितल पाटील, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,मुख्य लिपिक संजय तिवारी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा १६ जुलैला होणार सत्कार

## जिल्हा सोनार समाजसेवा संघाच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन

लातूर : शहर व जिल्ह्यातील १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा सोनार समाज सेवा संघाच्यावतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी तातडीने नावनोंदणी करण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील पांचाळ सोनार समाजातील मार्च २०२२/२३ मध्ये १० वी व १२ वी च्या परीक्षा उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवारी शहरातील कालिकादेवी मंदिरात आयोजित केला आहे. त्यासंदर्भातील कार्यकारिणीची बैठक ९ जुलै रविवारी कालिकादेवी मंदिरात घेण्यात आली.

तरी लातूर जिल्ह्यातील पांचाळ सोनार समाजातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुण पत्रकाची झेरॉक्स प्रत त्यामागे पालकाचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर शाळा/महाविद्यालयाचे नाव लिहावे. तसेच आधार झेरॉक्सप्रत संबंधीत जिल्हा, तालूका किंवा शहर पदाधिकारी यांच्याकडे तातडिने जमा करावे. असे आवाहन जिल्हा सोनार समाज सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष प्रा दिपक वेदपाठक, सचिव विवेक पंडित यांनी केले आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रकाची सत्यप्रत पदाधिकार्यांकडे जमा करावी. असे आवाहन सोनार समाजसेवा संघाच्यावतीने करण्यात आले आहे. बैठकीस जिल्हा अध्यक्ष प्रा. दिपक वेदपाठक, सचिव विवेक पंडित यांच्यासह कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष रविंद्र बारस्कर, संजय बारस्कर, अमोल दैठणकर, अरुण बारस्कर, यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



## रमाकांत पिडगे यांचा वाढदिवस साजरा

लातूर शहर महानगरपालिकेतील स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांचा आज वाढदिवस. त्यांच्या सहकाऱ्यांनी हा वाढदिवस साधेपणाने साजरा करून त्यांना पेढा भरविला.

जाहीरनामा

लातूर येथील श्री. एस. एन. भोसले, २ रे सह दि. न्या. व. स्तर, यांच्या न्यायालयात

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १०९६/२०२३
(अशोक/-) निशाणी क्रमांक ६

ज्यापेक्षा मयत व्यंकटराव देवराव चिंचोले यांचा मृत्यु दि. १७.०३.२००९ रोजी लातूर, ता. जि. लातूर येथे झाला असून, अर्जदार १. अशोक व्यंकटराव चिंचोले रा. भागीरथी निवास, विजय गोपाल अग्रवाल बिल्डींग जवळ, मोती नगर, लातूर, इतर वारस १. शिवाजी व्यंकटराव चिंचोले, इतर वारस २. सुभाष व्यंकटराव चिंचोले, इतर वारस ३. श्रीमंत व्यंकटराव चिंचोले यांनी मयताच्या पश्चात मयताचे कायदेशीर वारस या नात्याने शासकीय निमशासकीय कामासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत व्यंकटराव देवराव चिंचोले यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे वारसाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा वारस शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत व्यंकटराव देवराव चिंचोले यांचे वरील अर्जदार यांना कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

तारीख ०६ माहे ०७ सन २०२३
पु. ने. ता. १४/०८/२०२३

स्वाक्षरीत/-
बी. एस. समशेट्टे
क. लिपीक
२ रे सह. दि. न्या.
व. स्तर, लातूर.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व. स्तर, लातूर

# वडार समाज महामंडळाचा प्रश्न मार्गी लागणार का?

## राजकीय उदासीनतेमुळे प्रश्न जैसे थेच असल्याने नाराजी : श्रीकांत मुद्दे

लातूर : भटक्या विमुक्त जमातीतील एक असणाऱ्या वडार जमातीचे अनेक वर्षांपासून असंख्य प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून येत्या पावसाळी अधिवेशनात वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासह अन्य मागण्या मार्गी लागण्याची अपेक्षा वडार समाजाकडून व्यक्त होत आहे, असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

वडार जमात दगडाशी संबंधित असलेली कष्टकरी जमात आहे. स्वातंत्र्यानंतर त्यांचे शैक्षणिक सामाजिक आर्थिक आदी प्रश्न मार्गी लागले नाहीत. आजही अनेक प्रश्न प्रलंबितच आहेत. वडार समाजात शिक्षणाचा अभाव असल्याने तो दारिद्र्य अवस्थेत जगतो आहे. देशात हजारो वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या वडार जमातीचा राष्ट्राच्या उभारणीत मोलाचा वाटा आहे. प्राचीन लेण्या, हेमाडपंथी मंदिरे, आश्र्चर्यकारक शिल्पकृती, गड-किल्ले अशा कितीतरी कामांमध्ये या जमातीचे मोलाचे योगदान राहिलेले आहे, परंतु राजकीय उदासीनतेमुळे या जमातीचे प्रश्न स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीनंतरही जैसे थेच आहेत. तरुण बेरोजगारांची संख्या वाढत आहे, विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमिलियर च्या जाचक अटीमुळे भवितव्य अंधारमय आहे. या जमातीतील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे शिक्षण होऊनही आर्थिक सधनता नसल्याने नोकरी मिळत नाही भटक्या विमुक्तांसाठी वसंतराव नाईक महामंडळ असले तरी या जमातीला त्याचा फारसा फायदा होत नाही.

वडार जमातीला कुठल्याच योजना नसल्याने हा समाज खर्च परवडत नसल्याने उच्च शिक्षणात झेप घेऊ शकत नाही. मागच्या मा.देवेंद्र फडणवीस सरकारने विधानसभेपूर्वी वडार मेळाव्यामध्ये वडार समाजाच्या उन्नतीसाठी ५० कोटीची घोषणा केली होती, त्याची अधिसूचना निघाली मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. आजपर्यंतच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी प्रश्न सोडवण्याचे आश्र्वासन दिले शासन स्तरावर अधिसूचना देखील काढली परंतु अंमलबजावणी करण्याचे मात्र विसरूनच गेले. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकाळात एकाच वर्षात दोन मेळाव्यांना हजेरी लावली महामंडळाचा उप आराखडा तयार करून वडार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आणि त्यासाठी ५० कोटींचा निधी देण्याची घोषणा केली तसेच प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासन आणि समाज यांच्यात समन्वय राहण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय समन्वय समिती गठीत करण्याचे आणि राज्यमंत्रीपद देण्याचे ही त्यांनी जाहीर केले, परंतु पुढे काहीच मिळाले नसल्याची खंत वडार समाजाला आहे. वडार समाजाच्या प्रश्नांवर अभ्यास करणारे विविध आयोगांचे अहवाल धूळ खात पडले आहेत. अहवालाप्रमाणे प्रश्नांची सोडवणूक कधीही झाली नाही. त्याची कुठे वाच्यताही होत नाही. सद्यःस्थितीत तर महाराष्ट्रात राजकारणाचा अक्षरशः चिखल झाला आहे, यात आमचे प्रश्न सुटतील का? महामंडळाचा प्रश्न मार्गी लागेल का? हा एक मोठा प्रश्नचिन्हच निर्माण झाला आहे. कालौघात या जमातीचे असंख्य प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहेत. ते नवीन सरकारच्या काळात तरी मार्गी लागतील का हा खरा प्रश्न आहे. व्यवस्था बदलायची असेल तर सरकारला काही मूलभूत संकल्पना बदलावे लागतील. काही कायदे मुळापासून बदलावे लागतील. असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनातून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना केलेले आहे.

CHANGE IN NAME

I have change my name TAPEWALE SHAIKH AKHIL IMAM to SHAIKH AKHIL IMAM henceforth this declaration and will be known by this name SHAIKH AKHIL IMAM and will be used in future. The same name will be used by my wife, children and family.
OLD NAME : TAPEWALE SHAIKH . AKHIL IMAM
NEW NAME : SHAIKH AKHIL IMAM
ADDRESS : House No. 65 Killari Bhog 1, TQ. Ausa Dist - Latur (M.S.) - 413516

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते